चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०७ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# पोलीस स्टेशन भद्रावती आणि गडचांदुर यांची दारूतस्करीवर कार्यवाही

## ०३ आरोपीसह १३ लक्ष ६० हजार २०० रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक ०६/०७/२०२० रोजी **पोलीस स्टेशन भद्रावती** येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली कि, भद्रावती येथील बरांज तांडा गावालगतच्या नाल्याजवळ काही इसम गुळ सळवाचे ड्रम लावुन हातभट्टीद्वारे दारू तयार करतात. अशा माहितीवरून भद्रावती पोलीसांनी एक पथक तयार करून तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा टाकला असता, जंगलझुडपात नाल्याजवळ १५ मोठे प्लॉस्टीकचे ड्रम मिळुन आले. सदर ड्रम मध्ये २०० लिटर प्रमाणे ३००० लीटर गुळ सडवा दारू, किं. ६,००,०००/—रू, २ प्लॉस्टीक कॅन मध्ये १० लीटर प्रमाणे गुळ सडवा दारू किं. ५,०००/—रू, आणि इतर साहीत्य असा एकुण **६,२६,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्र. १५८/२०२० अन्वये नोंद करण्यात आला असुन आरोपींचा शोध आणि पुढिल तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

तसेच दिनांक ०६/०४/२०२० रोजी **पोलीस स्टेशन गडचांदुर** येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम कैलास नगर ते पैनगंगा कोसळा खदान मार्गे विरूर कडे एक चारचाकी वाहनाने अवैध रित्या दारूची तस्करी करणार आहे. आणि त्या चारचाकी वाहनासमोर एका दुचाकी वाहनाने एक इसम पायलेटींग करीत आहे. अशा माहितीवरून गडचांदुर पोलीसांनी पैनगंगा कोसळा खदान मार्गे विरूरकडे जाणाऱ्या पुलाजवळ नाकेबंदी लावुन वाहनांची तपासणी करीत असतांना एका दुचाकी आणि चारचाकी वाहनास ताब्यात घेवुन विचारपुस करून वाहनांची झडती घेतली असता हयुंडाई वाहन क्र. एमएच ३४ के ८६७७ मध्ये विदेशी दारू किं. २,१४,२००/— रू चा माल जप्त करण्यात आला आहे. सदर दारूचा मुद्देमाल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेली एक दुचाकी ज्युपीटर क्र. एमएच ३४ एझेड ८२८५ किं. २०,०००/—रू, आणि एक चारचाकी वाहन किं. ५,००,०००/—रू असा एकुण **७,३४,२००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन गडचांदुर येथे नोंद करण्यात आला असुन तीन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास गडचांदुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात **पोलीस निरिक्षक भद्रावती** श्री. पवार यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. सुधिर वर्मा, पोउपनि. श्री. तुळजेवार आणि पोलीस स्टेशन भद्रावती येथील कर्मचारी आणि **पोलीस स्टेशन गडचांदुर** येथील कार्यवाही पोलीस निरिक्षक श्री. गोपाल भारती यांचे नेतृत्वात सफौ शकील अंसारी, पोना अरविंद, पोशि. धिरज, चालक कमलेश यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————

# जुगार खेळणाऱ्याविरूध्द शेंगाव पोलीसांची धडाकेबाज कार्यवाही

४ आरोपींसह ४ लक्ष ५८ हजार ९४० रू चा मुददेमाल जप्त

दिनांक ०६/०४/२०२० रोजी पोलीस स्टेशन शेंगाव येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम मौजा खापरी गावाजवळील शेतशीवारात पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगारचा खेळ खेळत आहे. अशा माहितीवरून मौजा खापरी शेतशिवारात पोलीस पथक पोहचुन पाहणी केली असता, मिळालेल्या गोपनीय माहितीप्रमाणे ८ ते १० इसम जुगार खेळत असतांना दिसुन आले. सदर इसमांना ताब्यात घेण्यासाठी घेराव घावुन छापा टाकला असता काही इसम पळुन गेले तर ४ इसम जागेवरच मिळुन आले. सदर इसमांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता ते सर्व इसम जुगार खेळत असल्याबाबत सांगीतल्याने त्यांचे जवळुन नगदी रू. २,९२,८२०/—, पाच दुचाकी वाहन किं. १,५५,०००/—रू, तिन मोबाईल फोन किं. ११,०००/—रू, आणि इतर साहीत्य असा एकुण **४,५८,९४०/—रू** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन शेंगाव येथे नोंद करण्यात आला असुन एकुण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन शेंगाव सपोनि. श्री. बोरकुटे यांचे नेतृत्वात पोउपनि श्री. प्रविण जाधव सफौ महादेव सरोदे, मनोहर खोब्रागडे, पोहवा मनोहर आमने, पोशि. विठठ्ल वैद्य, प्रदिप मोंढे, बाळासाहेब कामले, रविंद्र तुराणकर यांनी पार पाडली.

———————————————————————————————————